
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काव्य फुलांची श्रद्धांजली

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९३५८



REFBK-0009418
REFBK-0009418

सेन्ट्रल प्रकाशन
मुंबई ४.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांना

# काव्य फुलांची श्रद्धांजली

: कवि :

साहेबराव कोकाटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २९७८ वि: ३०५
क्रमांक : ९३५८ नों दि: २५.११.२८
८१५१८

विठ्ठल शिंदे

(प्लेबॅक सिंगर आणि रेडियो स्टार)

REFBK-0009418
REFBK-0009418

: प्रकाशक :
एफ्. बी. बुरहानपू...
सेंट्रल प्रकाशन,
न्यू चर्नीरोड मुं. नं. ४

...द्रक :
... सापळे
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
त्रिभुवन रोड, मुं. नं. ४

किंमत तीन आणे

सेन्ट्रल प्रकाशन, न्यू चर्नीरोड, मुंबई ४

# — श्रद्धांजली —

चातुर्वर्णांच्या तटबंदीच्या आंत शतकानुशतकें रूढींच्या साखळ-दंडानें जखडलेल्या सात कोटी अस्पृश्यांना ज्यांनीं स्वाभिमान शिकविला, “आम्हांला माणुसकीचे साधे हक्क द्या” म्हणून दृढ निश्चयानें व आत्यंतिक तळमळीनें ज्यांनीं जगाला आवाहन केलें, “आम्हांला दयेची भीक नको! माणूस म्हणून मानानें जगण्याचा अधिकार पाहिजे आहे” म्हणून भिक्षुकशाही विरुद्ध ज्यांनीं बंड पुकारलें, स्वतंत्र भारताच्या घटनेचे शिल्पकार म्हणून भारताचा इतिहास ज्यांची कीर्ति गात राहील, असे थोर कायदे पंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होत. असा युगप्रवर्तक महापुरुष पुन्हा या जगांत जन्माला येईल कीं नाहीं, शंका आहे. बाबांच्या मृत्यूनें दलित समाज पोरका झाला आहे, आणि भारतमातेच्या कंठमालेंतील एक बुद्धिमान् रत्न गळून पडलें आहे. अखंड चिंतनांतून, तार्किकतेच्या निकषावर घासून आपलीं प्रखर मतें ज्यांनीं धारदार बनविलीं, आणि आतां भगवान् बुद्धाच्या दयामय कुशींत ज्यांनीं चिरकाल शांत झोप घेतली आहे, त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आमची, काव्य फुलांची श्रद्धांजली.

—साहेबराव कोकाटे

# तो दलितांचा भगवान्

( चालः–तेरे द्वार खडा भगवान् )

तो दलितांचा भगवान्–जगाला सोडूनी गेला
तयाला जरानसे अभिमान, शिकवी तो सत्य निती इमान
जगाला सोडूनी गेला ॥धृ०॥

अनाथांचा नाथबाबा, गरीबांचा कैवारी
आठव करूनी आज ज्याची, रडते जनता सारी
कराया दिनांचा उद्धार, जाहला भीमाचा अवतार
जगाला सोडूनी गेला ॥ १ ॥

भारतीय घटणेचा झाला, शिल्पकार भिमराया
कोणी उंच, नीच कोणी, नको हे भेद राहाया
राहावा देश हा सुखांत, जयाला वाटे असे दिनरात
जगाला सोडूनी गेला ॥ २ ॥

आजवरीना आला ऐसा लाल मातेच्या पोटीं
रात्रंदिवस उभा असे जो गोरगरीबांपाठीं
हा जातीपातीचा भेद, पाहूनी वाटे तयाला खेद
जगाला सोडूनी गेला ॥ ३ ॥

दाखविला जो मार्ग तयानें, त्यावर चाला सारे
एक दिलाने वागा, हातीं ध्वज एकीचा घ्यारे
दावूनी तुम्हांला वाट, भीम तो गरीबांचा सम्राट्
जगाला सोडूनी गेला ॥ ४ ॥

# ★ प्रबुद्ध झाले ! ★

( चालः–झाला महार पंढरीनाथ )

झाले प्रबुद्ध ते भीमराव !
न्यायाकडे घेतली धांव । झाले प्रबुद्ध ते भीमराव
ना आवडे तया अन्याय, म्हणूनीच झाला जनप्रिय
दिन दलित धरीती पाय २
मानुनी तयांसी देव । झाले प्रबुद्ध ते भीमराव ॥ १ ॥

जे कां रंजले गांजले, त्यांसी समजूनी आपुले
बाबा मदतीसाठीं धांवले २
तिन्ही जगांत गाजे नांव । झाले प्रबुद्ध भीमराव ॥ २ ॥

आम्हा अनाथांची माउली, आम्हा उद्धाराया जन्मली
जेव्हां जेव्हां हांक मारीली २
रक्षाया घेतसे धांव । झाले प्रबुद्ध ते भीमराव ॥ ३ ॥

किती गोड तयांची वाणी, आम्ही धन्य झालों ऐकूनी
प्रेमानें गाईली गाणीं २
भीमबाबा झडकरी पाव । झाले प्रबुद्ध ते भीमराव ॥ ४ ॥

का झोंप लागली आज, कांहीं ना कळे आम्हांस
जाहले कसे नाराज २
कोणासी दुःख सांगावं । झाले प्रबुद्ध ते भीमराव ॥ ५ ॥

★

# वैरीण झाली रात

( राग:–भैरवी )

हो ऽऽऽ वैरीण झाली ती रात–हो ऽऽऽ वैरीण झाली ती रात
कशी काळानें केली मात–वैरीण झाली ती रात ॥

कसा दुःखाचा हा डोंगर
आम्हा गोरगरीबांवर
कोसळला झाला आघात–वैरीण झाली ती रात ॥

लाज वाटली ना मृत्युला
गेला घेऊन तो बाबाला
केला अंधार साऱ्या जगांत–वैरीण झाली ती रात ॥

हांक मारावी आम्ही कुणा ?
कोण येईल हो रक्षणा ?
विझला दलितांचा दिपक आज–वैरीण झाली ती रात ॥

झोपी गेला तो बाबा कसा ?
झोपलेलाच् राहील का ?
कीर्रर एकांतीं काळोखांत–वैरीण झाली ती रात ॥

किर्ती राहील तयाची अमर !
उठा दलितांनो कसुनी कमर !
नाम भीमाचें हें गात गात–वैरीण झाली ती रात ॥

★

# अंतिम दर्शन

( चालः–सोनियाच्या ताटी )

तुम्हांला पाहून–तृप्तले लोचन
ऐका बाबा भीमराया हो–कधीं येणार दर्शन द्याया ?

एके सायंकाळीं उभा मी वाटेंत
तुमच्याच बाबा होतों प्रतिक्षेत
हातीं पुष्पहार–नयनीं अश्रुधार
हृदयांत दुःखाची छाया हो–कधीं येणार दर्शन द्याया ?

मुंबापुरीच्या लाखों नरनारी
दर्शनास तुमच्या, उभ्या वाटेवरी
कुणी छाती झोडी–कुणी धडपडी
तुमचें अंतिम दर्शन घ्याया हो–कधीं येणार दर्शन द्याया ?

भरती आली तेथें जन सागरास
आई ओळखेना पहा लेकरास
जो तो हेंच बोले–बाबा कुठें गेले ?
आम्हां येथें सोडूनीयां हो–कधीं येणार दर्शन द्याया ?

इतुक्यांत तुमची आली तिथें गाडी
दास हा तुम्हांला प्रेमें हात जोडी
बहु प्रेमानें पाहिली–ती दिनांची माऊली
भीमरायाच्या लागलों पाया हो–कधीं येणार दर्शन द्याया ?

★

# घात झाला घात

( चालः-आग लगी है आग )

मृत्यु रुपी त्या राक्षसाने, कैसी केली मात
घात झाला घात हो घात झाला घात ॥ धृ० ॥
पहिलें वंदन त्या दिन दलितांच्या देवा ।
दयेच्या सागरा त्या बाबा भीमरावा ।
मागणी हीच आहे आज श्रोतियां चरणीं ।
ऐका गीत असुचें शांत चित्त ठेवुनी ।
कित्तेक तुम्ही ऐकिलीं असतील गाणीं ।
परंतु ऐकिली नसेल ऐसी कहाणी ।
ऐकण्या पूर्वींच अश्रु तुमच्या, कां उभे डोळयांत ?
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १ ॥

आला भीमराव ऐसा मातेच्या पोटीं ।
झटला जन्मभर गोरगरीबांसाठीं ।
ज्याची कितीं गाजे देशीं अन् परदेशीं ।
धडा एकीचा शिकवी मानव जातीशी ।
नको जाती, धर्म, उंच, नीच भेद भाव ।
अमृत समनतेचं पाजी जगा भीमराव ।
हाल दिनांचे पाहूनी जो, सदा असे दुःखांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ २ ॥

स्वतंत्र भारताचा कायदेमंत्री झाला ।
आदर्श देश बनवूं पाहे या देशाला ।

समान हक्क मिळावा येथें प्रत्येकाला ।
खोटेपणाची मोठी चीड असे त्याला ।
दरेक मानवानें सुखी राहावें संसारीं ।
गोरगरीबांवरी प्रेम तयांचें भारी ।
किर्ती त्याची दिगंत गाजत, राहील या देशांत
घात झाला घात हो घात झाला घात ॥ ३ ॥

एके दिवशींची ऐका हो हकिगत ।
फिरता फिरता गेले बाबा एका गांवांत ।
गेले भेट घावयास त्या महारवाड्याला ।
इतुक्यांत वृद्ध एक बाबांजवळी आला ।
रडूं लागला धरूनी बाबांचे चरण ।
म्हणे मिळाला देव, मी जाहलों धन्य ।
सार्थक झालें नरजन्माचे, आतां मरीन सुखांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ ४ ॥

वृद्ध, बाबांना प्रश्न विचारूं लागला ।
मानाचें स्थान केव्हां मिळेल अपुल्याला ? ।
आयुष्य घालविलें तुम्हीं झटतां झटतां ।
मार्ग निराळाच शोधा आतां एखादा ।
का बरं नीच म्हणती अजूनी लोक आम्हांला ।
एवढा काय बाबा अपराध आम्हीं केला ।
ऐकून अश्रु गरगर आले, बाबांच्या डोळयांत
घात झाला घात हो घात झाला घात ॥ ५ ॥

हकिगत केली सारी निवेदन वृद्धानें ।
लाल जाहले ते भीमबाबा रागानें ।

शमवुनी राग ते सांगूं लागले प्रेमानें
व्याकुळ होऊं नका बाबांनो दुःखानें
बरें होईल सारें कांहीं करूं नका चिंता
जगाची चिंता करतो सदा तो दाता
वेळ लागेल सुधारणेला, जा लागा कामांत
घात झाला घात हो घात झाला घात ॥ ६ ॥

इतुक्यांत हरिजन तो दुसरा वदला ।
मिळेल देव कैसा सांगा हो आम्हांला ।
कसे मंदिरांत जाऊन तयास भेटावें ।
अपुलें दुःख त्यास कैसें सांगावें ।
मंदिरांत जातां होतो आमुचा विटाळ ।
कसे अभंग गावे कसा वाजवावा टाळ ।
नैवद्य कैसा घेऊनी जावा, देवाच्या दारांत
घात झाला घात हो घात झाला घात ॥ ७ ॥

इतुकें ऐकुनियां भीमबाबा गहिंवरले ।
हृदय त्यांचें बहुत दुःखी झालें ।
पवित्र देवता ती असे विचारसरणीची ।
काय महिमा वर्णू मी रज त्याचे चरणींची ।
तयांचें हृदयीं वसे दया क्षमा शांती ।
दिन अनाथांसाठीं ते चिंतातुर असती ।
पाहिला नाहीं ऐसा महात्मा, मी माझ्या जीवनांत
घात झाला घात हो घात झाला ॥ ८ ॥

एक निराळाच विचार सुचला बाबांना ।
दिधली हांक त्यांनीं दिनदुबळ्या दलितांना

म्हणे उठा उठा रे आतां जागे व्हा दलितांनो ।
गोरगरीब, मोलमजूर यारे यारे बंधूंनो ।
जाऊंया आपण सारे आतां बुद्ध धर्मांत ।
बहुत मान असे हो माणुसकीला ज्यांत ।
जीवन कंठूं आपण सारे, मानानें या जगांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ ९ ॥

नको मंदिरामधें प्रवेश आम्हांला ।
नको तो देव, आमुची फिकिर ना ज्याला ।
नको तो धर्म जिथें स्थान मानाचें ।
विटाळ होती जिथें मानवास मानवाचे ।
सांगा सांगा ऐसा धर्म काय कामाचा ।
करुंया त्याग आपण सारे मिळून याचा ।
वार्ता ऐसी पसरली साऱ्या, या भारत देशांत ।
घात झाला घात्त हो घात झाला घात ॥ १० ॥

नको उराया जगीं हरिजन हें नांव ।
तयार जाहले क्रांती करण्या भीमराव ।
ठरला बेत असा धर्मांतर करण्याचा ।
जगांत मानवानें मानव म्हणून घेण्याचा ।
मध्य प्रांतामध्यें नागपूर शहरांत ।
भरला मेळावा एक मोठ्या थाटांत ।
मानव इतुका जन्मला, जैसी भरती ये दर्यांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ ११ ॥

कथण्या शब्दांनी स्तुति करूं त्या मेळ्याची ।
पडेल पांगुळी भाषा, मज अज्ञानाची ।

क्रमांक ...३२५८... नों: दि: ...११... २।।।२४

लाखों बांधव ते बौद्ध धर्मी झाले।
नाइलाजानें हिंदू धर्म सोडूनी गेले।
आज जगांत ज्याचे गाजत आहे नांव।
जाहला प्रबुद्ध तो बाबा भीमराव।
क्रांती घडली नव्हती ऐसी, देशाच्या इतिहासांत
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १२ ॥

करूनी नागपुरांत ऐसें धर्मांतर।
गेले दिल्लीस ते बाबा आंबेडकर।
तारीख ठरली पहा मुंबईस येण्याची।
लाखोंच्या संख्येने बुद्ध दिक्षा घेण्याची।
होणार धर्मांतर तें साऱ्या महाराष्ट्रांत।
पुढारी गढून गेले सारे अशा प्रचारांत।
वार्ता पसरली बहू वेगानें, खेडोपाडीं शहरांत।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १३ ॥

बाल बुद्धीनें पहा ऐसें वाटतें मजला।
स्वर्गीच्या देवांना भीमबाबा आवडला।
बाबास भेटण्याची इच्छा असेल त्यांची।
करण्या विचार, भरली सभा देवांची।
ठरला बेत त्यांचा, भीमास येथें आणावें।
ऐशा महात्म्यास आपुल्या संगें ठेवावें।
भीमरायानें सदा रहावें, या अपुल्या स्वर्गात।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १४ ॥

म्हणावें दुर्दैव हें या भारत देशाचें।
लाखों गोरगरीब दलितांचे।

६४९८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ

बाबा प्रिय असे प्राणाहून सर्वांना ।
ठाऊक होतें ऐसे स्वर्गीच्या देवांना ।
म्हणूनीच त्यांनीं रचीला ऐसा कावा ।
कोणासी न कळत भीमासी आणावा ।
पडणार आतां आंधार, लाखों गरीबांच्या जिवनांत
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १५ ॥

डिसेंबर महिन्याच्या पांच तारखेला ।
रात्री गरीबांचा तो देव झोपी गेला ।
आला काळ तो मृत्यूचें रूप घेऊन ।
नकळत घेऊनियां गेला बाबांचे प्राण ।
दुजे दिवशीं सकाळीं सूर्योदय झाला ।
बाबांसाठीं चहा घेऊन सेवक गेला ।
म्हणे धन्यासी उठा उठा हो, पहा झाली प्रभात ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १६ ॥

इतुका वेळ कधीं धनी अपुले झोपत नाहीं ।
आज का बरें अजुनी उठलेंच नाहीं ।
हलवूनी पाहीले, तेव्हां ध्यानी त्याचे आलें ।
चिर निद्रेंत धनी आपुले झोपी गेले ।
सबंध देशामधें उडाली ऐसी खळबळ ।
ऐकुनी दीन दलित रडूं लागले घळ घळ ।
निर्दयता इतुकी वसते का हो, देवाच्या हृदयांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १७ ॥

दुसरा प्राण मिळाला नाहीं का हो मृत्युला ।
आधारस्तंभ तो आमुचा घेऊन गेला ।

थोर महात्मा आमुच्या भीमराया जैसा ।
घेऊनि जन्म पुन्हा येईल सांगा कैसा ।
कोण देईल आतां "वो" आमुच्या हांकेला ।
होईल संकटांत साह्य कोण आम्हाला ।
ऐकील आता कोण आमुचें, दुःख संसारांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १८ ॥

आणीला देह बाबांचा मुंबानगरांत ।
ठेविला दर्शनासाठीं त्या राजगृहांत ।
दर्शनास्तव जमल्या लाखो नरनारी ।
बुडाली दुःख सागरांत ही मुंबानगरी ।
निघाली मिरवणूक ती महा निर्वाणाची ।
चालली गर्दी मागें पुढें मानव जातीची ।
प्रत्येकांच्या नयनी अश्रु, दुःख असें हृदयांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ १९ ॥

पवित्र देहास बाबांच्या साक्ष ठेवूनी ।
घेतला बुद्ध धर्म लाखो बंधू भगिनींनी ।
जरी आज आम्हास बाबा सोडून गेले ।
आठवण ठेवा त्यांनीं जे जे तुम्हा शिकविलें ।
कसें चाललेर दादांनो धीर सोडून ।
रडूं नका हा दास सांगे हात जोडून ।
चित्त असूं द्या सदासर्वदा, बाबांच्या स्मरणांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ २० ॥

शिकवण त्यांची असूंद्यावी मनीं ध्यानीं ।
करा प्रतिज्ञा आज त्यांना साक्ष ठेवूनी ।

व्हा प्रबुद्ध, तुम्ही सांगा सांगा सर्वांना ।
त्यामुळें शांती मिळेल अपुल्या प्रिय बाबांना ।
आत्मा कुणाचा दुःखवूं नका, बोलूं नका खोटें ।
झगडा अन्यायाशी असें सांगे तुम्हां कोकाटे ।
श्रद्धेचे हें पुष्प वाहिलें बाबांचे चरणांत ।
घात झाला घात हो घात झाला घात ॥ २१ ॥

## बाबासाहेब करे पूकार !

( चालः—निर्बल से लढाई )

सुनो ध्यानसे यह भीमकी पूकार को ।
तोडो ऊंच, नीच भेद की दिवार को ॥
गर तुफान राहमे आये, हम उससे भी टकरायें
जोर जुल्मोंसे लढते जायेंगे ।
मानव जातीको जगाने, भेदभावोंको मिटाने
नया इन्क्राव देशमे लायेंगे ।
यही लगी है लगन, घरसे निकले है हम
कुछ करके बताने संसारको ।
तोडो ऊंच, नीच भेदकी दिवारको ॥ १ ॥
राह भीमने दिखलाई, वो ही हमने अपनाई
लिया एकताका हाथमे निशान है ।
मुहमे शांतीका संदेश, सारे मिटायेंगे क्लेश
साथमे सत्य निती और इमान है ।

क्रमांक २२५८ नों: दिः २५ ११-१-५८

रखना भीमबाबा लाज, तुमसे यही विनय है आज
देना आधार हम निराधारको।
तोडो ऊंच, नींच, भेदकी दिवारको ॥ २ ॥

बाबा दो ऐसा वरदान, जिससे बनी रहे शान
अपने देश धरम इमान की।
निर्धन हो या धनवान, निर्बल हो या बलवान
इज्जत बनी रहे यहां इन्सानकी।
तेरे चरणोंकी कसम, खाकर निकल पडे है हम
अब सुनलो हमारी ललकार को।
तोडो ऊंच, नीच, भेद की दिवारको ॥ ३ ॥

कब अवोगे भीमराव, हम गरीबोंके गांव
हम रहेंगे सदा इन्तजार में।
तुम आवोगे एकदिन, है हमको यकीन
अजब जादू है तुम्हारे प्यारमे।
पडूं पांव तुम्हारे, सुनो राज दुलारे।
कही भूलना जाना इस लाचारको।
तोडो ऊंच, नीज, भेदकी दिवारको ॥ ४ ॥

## क्यों लेगई मौत

( चालः-देदी हमे आझादी )

क्यों लेगई ओ मौत दलितों का सहारा।
क्यों छीन लीया हमसे भीम बाबा हमारा ॥
बुद्धं सरणं गच्छामि।
जिसने हरिजनो के लीये त्यागाथा संसार।
हम दीन अनाथों से वह करता था बहुत प्यार।

१४७८



गूंजी थी सारे देशामे यह भीम की पूकार ।
इन्सान को दो शान से जिनेका अधिकार ।
गर्दीश मे है गरीबोंकी किस्मत का सितारा ।
क्यों छीन लीया हमसे भीम बाबा हमारा ॥ १ ॥
बुद्धं सरणं गच्छामि

इस जुल्मी जमाने ने हमे खूब सताया
एक भीम ही मदतके लिये दौड के आया ।
दुनियासे निराला हमे मार्ग दिखाया ।
क्यों मौत को हमारा भाई तर्स न आया ।
अब कौन हमे आकर के देगा सहारा ।
क्यों छीन लीया हमसे भीमबाबा हमारा ॥ २ ॥
बुद्धं सरणं गच्छामि

पीछे नही हटा वो भीम आगेही बढा ।
अन्याय अत्याचारसे सदैवही लढा ।
शांती का पुजारी वह दयालु था बडा ।
दुःखीयोंकी मदत के लिये सदाही था खडा ।
हम सैनिक थे उसके वह सरदार हमारा ॥ ३ ॥
क्यो छीन लीया हमसे भीमबाबा हमारा ॥ ३ ॥
बुद्धं सरणं गच्छामि

चमकेगी बडे शानसे उस भीमकी गदा ।
दुनिया को देगी शांतीका संदेश सर्वदा ।
क्षमा करना हमे बाबा, गर हमसे हो खतां ।
दुनियाको सुनाउंगा मै जयजयकार तुम्हारा ।
क्यो छीन लीया हमसे भीमबाबा हमारा ॥ ४ ॥
बुद्धं सरणं गच्छामि

[ समाप्त ]

REFBK-0009418
REFBK-0009418

# आमचे नवीन प्रकाशन !

छापून तयार ! छापून तयार !! छापून तयार !!!

## दलितांचे बाबा

( डॉ, आंबेडकरांचे चरित्र आणि कार्य )

★

लेखक : **शांताराम पाटील**

ह्या पुस्तकात स्वतंत्र भारताच्या घटनेचे शिल्पकार, सात कोटी अस्पृश्यांचे उद्धार कर्ते डॉ. आंबेडकरांचे अल्प चरित्र मुद्रित केलेले आहे. मुखपृष्ठावर बाबासाहेबांचें तीरंगी चित्र पृष्ठें ३२

**किं. ४ आणे.**

---

**सेन्ट्रल प्रकाशन**
**न्यु चर्नीरोड. मुंबई ४.**


---


मुखपृष्ठ छपाई : आशा प्रिंटरी : मुंबई ४.